# समुपदेशन

समुपदेशन

प्रभात – दि. १७ जुलै, २०१९

# बालगुन्हेगार मुख्य प्रवाहात येण्याचा 'भरोसा'

## पोलिसांनी केले मुले, पालकांचे समुपदेशन : अजाणतेपणी गुन्हेगारांच्या संपर्कात आल्याची कबुली

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १६ -** मागील काही वर्षांत शहरातील बालगुन्हेगारी हे पोलिसांपुढे मोठे आव्हान ठरले होते. विशेषतः खून, खुनाचा प्रयत्न अशा गुन्ह्यांमध्येही बालगुन्हेगारांचे प्रमाण मोठे दिसत होते. या बालगुन्हेगारांना भरोसा सेलच्या माध्यमातून मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सुरू आहे. या बालगुन्हेगारांच्या समुपदेशनादरम्यान अजाणतेपणी गुन्हेगारांच्या संपर्कात आल्याने त्यांच्या हातून गुन्हे घडले असल्याचे समोर आले.




शहरात बालगुन्हेगारीकडे वळलेल्या ४५७ विधीसंघर्षित बालकांना (बालगुन्हेगार) मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांचे आणि पालकांचे समुपदेशन करण्यात आले. गुन्हेगारी मानसिकतेतून बाहेर पडण्यासाठी, चांगले मित्र, शिक्षण याचे महत्त्व सांगण्यात आले. तर, त्यांच्या पालकांना राहणीमानात सुधारणा करण्याबरोबरच व्यसनाधिनता टाळण्याचे सांगण्यात आले. भरोसा सेल अंतर्गत विशेष बाल रक्षा पथकाकडून ही कार्यवाही करण्यात आली.

शहरात बालगुन्हेगारीमध्ये वाढ होत चालली आहे. मागील ३ वर्षांत विविध गुन्ह्यांमध्ये १,२०० पेक्षा जास्त बालगुन्हेगारांचा सहभाग असल्याचे आढळले होते. बालगुन्हेगारांना गुन्हेगारीपासून परावृत्त न केल्यास हेच बालगुन्हेगार नंतर अट्टल गुन्हेगार बनतात. त्यामुळे पुणे पोलिसांच्या भरोसा सेलमधील विशेष बाल सुरक्षा पथकाकडून बालगुन्हेगारांना मुख्य प्रवाहात आण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. त्यानुसार पथकाच्या निरीक्षक शिल्पा चव्हाण, उपनिरीक्षक बाळासाहेब भोर, पोलीस हवालदार शरद देडगे, अविनाश पवार, जर्नादन केदार, उमेश आटोळे, विजय देशमुख, मयुर दळवी यांच्या पथकाने शहरातील विविध पोलिस ठाण्यात जाऊन बालगुन्हेगारांचे समुपदेशन केले. त्यासाठी त्यांना लाइफ फाउंडेशन या संस्थेचे नरेन घोडियाल, समुपदेशक अमित वरदे, पंकज पिपाडा, डॉ. प्रीती पुरोहित, नरेश गांधी, राजेश शेट्टी, पंख फाउंडेशनचे स्मिता आपटे, मीना चितळे, ज्योती काटीकर, श्वेता सूर्यवंशी यांची मदत झाली.

### घेतल्या तब्बल २५ बैठका

पोलीस व सामाजिक संस्थांनी पोलीस ठाण्यांमध्ये २५ बैठका घेतल्या; तर सहायक आयुक्त यांच्या स्तरावर ९ बैठका घेण्यात आल्या. यामध्ये विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ४५७ बालगुन्हेगार आणि त्यांच्या पालकांचे देखील समुपदेश केले. बालकांना बालगुन्हेगारीपासून रोखण्यासाठी काय करावे लागेल, याची माहिती पालकांना देण्यात आली.

### व्यसनांचेही प्रमाण जास्त

अल्पयीन मुलांमध्ये व्यसनांचेही प्रमाण जास्त दिसत आहे. दारू, गांजा, बिअर , सिगारेट, तंबाखू अशा व्यसनांच्या आहारी ही मुले गेलेली दिसतात. मागील काही दिवसांत पालक स्वत: अशा व्यसनी मुलांना भरोसा सेलमध्ये घेऊन आले आहेत. त्यांना व्यसनमुक्ती केंद्रामार्फत औषधे सुरू करण्यात आली आहेत.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १६ जुलै, २०१९

**जीवन सुधारण्याबाबत मुलांसह पालकांना मार्गदर्शन**

# ४५७ बालकांचे समुपदेशन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

शहरात बालगुन्हेगारीकडे वळलेल्या ४५७ विधीसंघर्षित बालकांना (बालगुन्हेगार) मुख्य प्रवासात आणण्यासाठी त्यांचे आणि पालकांचे समुपदेशन करण्यात आले. गुन्हेगारी मानसिकतेतून बाहेर पडण्यासाठी, चांगले मित्र, शिक्षण याचे महत्त्व सांगण्यात आले. तर, त्यांच्या पालकांना राहणीमानात सुधारणा करण्याबरोबरच व्यसनाधीनता टाळण्याचे सांगण्यात आले.

शहरात बालगुन्हेगारीमध्ये प्रत्येक वर्षी वाढ होत चालली आहे. अनेक लहान मुले विविध कारणांमुळे बालगुन्हेगारीकडे वळत असल्याचे दिसून आले आहे. गेल्या तीन वर्षांत विविध गुन्ह्यांमध्ये बाराशेपेक्षा जास्त बालगुन्हेगारांचा सहभाग असल्याचे आढळले होते. बालगुन्हेगारांना गुन्हेगारीपासून परावृत्त न केल्यास हेच बालगुन्हेगार नंतर अट्टल गुन्हेगार बनतात. त्यामुळे पुणे पोलिसांच्या भरोसा सेलमधील विशेष बाल सुरक्षा पथकाकडून बालगुन्हेगारांना मुख्य प्रवाहात आण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यास सांगितले होते. त्यानुसार पथकाच्या निरीक्षक शिल्पा चव्हाण, उपनिरीक्षक बाळासाहेब भोर यांच्या पथकाने शहरातील विविध पोलिस ठाण्यात जाऊन बालगुन्हेगारांचे समुपदेशन केले. त्यासाठी त्यांना लाइफ फाउंडेशन या संस्थेचे नरेन घोडियाल, समुपदेशक अमित वरदे, पंकज पिपाडा, डॉ. प्रीती पुरोहित, नरेश गांधी, राजेश शेट्टी, पंख फाउंडेशनचे स्मिता आपटे, मिना चितळे, ज्योती काटीकर, श्वेता सूर्यवंशी यांची मदत झाली.

पुणे पोलिस व सामाजिक संस्थांनी पोलिस ठाण्यांमध्ये २५ बैठका घेतल्या; तर सहायक आयुक्त यांच्या स्तरावर नऊ बैठका घेण्यात आल्या. यामध्ये विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ४५७ बालगुन्हेगारांचे समुपदेशन करण्यात आले. तर, बालगुन्हेगारांच्या १३५ पालकांचे देखील समुपदेश केले. बालकांना बालगुन्हेगारीपासून रोखण्यासाठी काय करावे लागेल, याची माहिती पालकांना देण्यात आली. याचा फायदा झाला असून अनेक मुले शिक्षण घेत असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.



**'भरोसा सेलकडे संपर्क साधा'**

पालकांना आपली अल्पवयीन मुले, मुली घरात व्यवस्थित वागत नाहीत, शिक्षण घेत नाहीत, मोबाइल व व्यसनाधीन झाली आहेत, अशा मुलांचे देखील समुपदेशन करून त्यांच्या अडचणी दूर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे अशा प्रकारे वागणूक असणाऱ्या मुलांच्या पालकांनी भरोसा सेलच्या विशेष बाल सुरक्षापथकाकडे संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# पोलिसांनी केले विद्यार्थिनींना समुपदेशन

लोकमत न्यूज नेटवर्क

सहकारनगर : 'मॅडम, तुम्ही आमच्याशी एवढं मनमोकळेपणे बोलता, आम्हाला तुमचा आधार वाटतो. त्या मुळे मलासुद्धा मोठी झाल्यावर पोलीस अधिकारी व्हायचं! आणि तुमच्या प्रमाणे मुलींच्या अडचणी सोडवायच्या आहेत.'

हे वाक्य आहे एका शालेय विद्यार्थिनीचं आणि प्रसंग आहे महिला पोलीस अधिकारी नेहमीप्रमाणे शाळेत येऊन १० वी १२वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनींशी संवाद साधून त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी आल्या असता. त्यांच्याशी मुलींनी केलेला संवाद.

लक्ष्मीबाई शिंदे हायस्कूल, सहकारनगर येथे आयोजित केलेल्या बैठकीत त्यांनी मुलींशी संवाद साधला व मुलींनी मोबाईल इंटरनेटमध्ये अधिक गुंतून राहू नये, अनोळखी व्यक्तीने फ्रेंड रिक्वेस्ट पाठविल्यास त्याची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारु नये. आपले फोटो फेसबुकवर शेर करु नये, त्याचा कोणी गैरवापर करु शकतो. आपल्या आई-वडिलांनी आपल्याला लहानचे मोठे केलेले असते त्यांचे ऐकावे. कमी वयात अभ्यास सोडून चुकीच्या मोहमयी जगाकडे वळू नये असे सांगितले. त्या वेळेस मुलींनी त्यांच्याशी अत्यंत मोकळेपणे आपल्या समस्या सांगितल्या.



दत्तवाडी पोलिसांकडून मुलींना करण्यात आले समुपदेशन.

◆ महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळेत महिला पोलीस अधिकारी जाऊन तेथील मुलींना कोणी त्रास देतो आहे का, या बाबत त्यांच्याशी बोलतील, त्यांना गुड टच व बॅड टच याबाबत माहिती देतील, त्यांच्या हॉस्टेलमध्ये सुरक्षारक्षक आहेत का, त्या मुलींना काय सुविधा दिल्या जातात याची माहिती घेतली तसेच कोणी माथेफिरु तरुण त्या मुलींना जाता-येता त्रास देत नाही ना, याची माहिती घेतली.

दत्तवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पथकाच्या प्रमुख पोलीस उपनिरीक्षक प्रणिता हजारे यांनी परिसरातील मुलींच्या शाळेत भेट देऊन मुलींशी बोलून त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या. मुख्यध्यापक रामकृष्ण शिंदे, क्रीडा शिक्षक विकास वाशीलकर, भारती गोगावले, सहायक पोलीस निरीक्षक बाळासाहेब पाटील, महिला पोलीस नाईक राणी शिंदे, पोलीस नाईक तुळशीराम टेंबुरने, सतीश भारती हे कार्यक्रमास उपस्थित होते.

**पुढारी** – दि. ०६ जुलै, २०१९

# रागाच्या भरात घरातून गेलेल्या मुलीचा शोध...

**पुणे : प्रतिनिधी**

आईसोबत किरकोळ वाद झाल्यानंतर रागातून घर सोडलेल्या अल्पवयीन मुलीचा पोलिसांनी काही तासांत शोध घेऊन तिला सुखरूप कुटुंबीयांच्या ताब्यात दिले.

कोथरूडमधील हॅपी कॉलनीत या अल्पवयीन मुलीचे कुटुंबीय राहतात. तिची आई धुण्या-भांड्याची कामे करते. दरम्यान, घरगुती कारणावरून या मुलीचा आईशी वाद झाला. रागाच्या भरात मुलगी घरातून निघून गेली. बराच वेळ झाल्यानंतरही मुलगी घरी न आल्याने कुटुंबीयांनी अलंकार पोलिस ठाण्याच्या अखत्यारीतील डहाणूकर पोलिस चौकीत धाव घेऊन माहिती दिली. या वेळी सहायक निरीक्षक उमेश माळी यांनी गांभीर्याने दखल घेऊन पोलिस हवालदार शिंदे व मोहिते यांना मुलीचा शोध घेण्याच्या सूचना केल्या.

परिसरात शोध घेत असताना मुलगी एका सोसायटीत बसल्याचे पोलिसांना दिसून आले. त्यांनी तिच्याकडे चौकशी केली. या वेळी तिने आईबरोबर भांडण झाल्याने घरातून निघून तेथे बसल्याचे सांगितले. यानंतर पोलिसांनी तिच्या कुटुंबीयांना माहिती देऊन चौकीत बोलावून तिला सुखरूप त्यांच्या ताब्यात दिले.

**पुढारी** – दि. ०४ जुलै, २०१९

# आत्महत्येसाठी निघालेल्या व्यक्तीचे वाचवले प्राण

## पोलिस आणि अग्निशमन दलाची तत्परता

**पुणे : प्रतिनिधी**

पोलिस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी प्रसंगावधान दाखवत आत्महत्येचा प्रयत्न करून परत आत्महत्या करण्यास निघालेल्या व्यक्तीचे प्राण वाचवले आहेत. विनोद विठ्ठल जगताप (३६, रा. वडगाव धायरी) असे त्या व्यक्तीचे नाव आहे. बुधवार (दि.३) रोजी दुपारी तीनच्या दरम्यान आनंदनगर जगताप हॉस्पिटलसमोर सिंहगड रस्त्यावर एक व्यक्ती हरीहर नाबर यांच्या इमारतीच्या

टेरेसवर चढला असून, तो आत्महत्या करण्याच्या प्रयत्नात आहे, अशी वर्दी अग्निशमन केंद्राला मिळाली होती. त्या वेळी एरंडवणा अग्निशमन केंद्रातील जवानांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. या वेळी समजले की, सदरच्या व्यक्तीने घरगुती वादातून सकाळी राहत्या घरी आत्महत्येचा प्रयत्न केला होता. त्यामुळे त्याला नातेवाईकांनी व मित्रांनी सिंहगड रस्त्यावरील एका हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी आणले होते. त्या वेळी तो पळून जाऊन समोरच्या इमारतीवर चढला व आत्महत्या करण्याची धमकी देऊ लागला होता. प्रत्यक्ष पहाणी केली असता तो टेरेसवर त्या ठिकाणी असलेला एक लोखंडी रॉड, फुटलेली बाटली व बागकाम करण्याठी लागणारा विळा घेऊन बसला होता. दरम्यान पोलिसांनी त्याच्याशी संवाद साधून बोलतं करण्याचा प्रयत्न केला व खाली येण्यास सांगितले. मात्र, त्याने कोणताच प्रतिसाद दिला नाही. याच वेळी काही जणांनी त्याला बोलण्यात व्यस्त ठेवून पाठीमागून इमारतीवर जाऊन ताब्यात घेतले.

सदरची कामगिरी सिंहगड रोड पोलिस व अग्निशमन केंद्राचे अधिकारी राजेश जगताप, फायरमन राजेंद्र पायगुडे, नीलम शहाणे, विठ्ठल सावत यांच्या पथकाने केली.

# आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याला रोखले

## बोपोडी चौकातील पुलाजवळील घटना

पुणे : प्रतिनिधी

सतत होणाऱ्या घरगुती वादामुळे आलेल्या नैराश्यातून पुलावरून उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या तरुणाला जिवाची बाजी लावत खडकी पोलिसांच्या बीट मार्शल गिरासे आणि घोलप यांनी रोखले. या धाडसामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

गुरुवारी दुपारची अडीचची वेळ.... पोलिस नियंत्रण कक्षातील फोन खणाणतो... बोपोडी पुलावरून एक तरुण उडी मारून आत्महत्या करण्याच्या तयारीत असून, त्याला नागरिकांनी रोखण्याचा प्रयत्न केला, मात्र तो कोणालाही दाद देत नाही. त्यामुळे या ठिकाणी तत्काळ मदत पाहिजे.. अशी विनंती केली जाते.

या संपूर्ण घटनेची माहिती मुख्य नियंत्रण कक्षातन खडकी पोलिसांना दिली जाते. बोपोडी मार्शलचे कर्मचारी गिरासे आणि घोलप घटनास्थळी तत्काळ धाव घेतात. त्यावेळी समोर एक व्यक्ती बोपोडी चौकातील वि. भा. पाटील पुलाच्या खाली असलेल्या सिमेंटच्या पिलरवर चढून नदीत उडी मारण्याच्या तयारीत होती. साधारण दीडशे ते दोनशे बघ्यांची गर्दी जमली होती. परंतु गर्दीतील एकाही व्यक्तीची त्याला रोखण्याची हिंमत झाली नाही. अनेक लोक त्याला वरती येण्याची विनंती करत असतानासुद्धा तो कोणाचेही ऐकत नव्हता. अतिशय अडचणीच्या ठिकाणी तो जाऊन उभा राहिला होता. अशा परिस्थितीत पोलिस कर्मचारी गिरासे आणि घोलप नदीपात्रातील नाल्यात असलेल्या पाइपवर चढून पिलरजवळ गेले. या दोघांनी त्या व्यक्तीला खाली उतरण्याची विनंती केली. परंतु तो तुम्ही जर माझ्या जवळ आला तर मी उडी मारेन असे मोठ्याने ओरडू लागला. एकाने त्याला बोलण्यात गुंगवत दुसऱ्याने प्रसंगावधान राखत त्याचे दुर्लक्ष होताच झडप मारून त्याला ताब्यात घेतले आणि नदीपात्रातून बाहेर आणले. त्या व्यक्तीने उडी मारली तर त्याला तत्काळ पाण्याबाहेर काढता यावे यासाठी नदीपात्रात जीवरक्षक टीमला तैनात करण्यात आले होते.

त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने नाव अमर शिंदे (वय-२६, रा. भाऊ पाटील रोड, बोपोडी) नाव बदललेले आहे असे सांगितले. घरगुती वाद झाल्यामुळे आलेल्या नैराश्यातून त्याने आत्महत्या करण्याच प्रयत्न केल्याचे सांगितले. यानंतर खडकी पोलिस ठाण्याचे गुन्हे निरीक्षक शफिल पठाण यांनी तरुणाच्या पत्नीला पोलिस ठाण्यात बोलावून घेतले. यावेळी दोघांचेही समुपदेशन केले व दोघांनीही या पुढे भांडण न करण्याचे आश्वासन देत तरुणाने आत्महत्येचा विचार सोडून दिला.

# गुन्हेगारीकडे वळलेली पावले शिक्षणाकडे

## पोलिस अधिकाऱ्याच्या प्रयत्नामुळे अल्पवयीन मुलास शाळेत प्रवेश

**पुणे, ता. १४ :** 'कोयता गँग'मध्ये असणारा अल्पवयीन राजा (नाव बदललेले आहे) पोलिसांच्या हाती लागला. इतरांप्रमाणेच त्यालाही पोलिस बालसुधारगृहात पाठविणार होते. चुकीचा मार्ग निवडण्याचे कारण विचारल्यानंतर, 'मला शिकायचेय; पण घरची परिस्थिती चांगली नाही...' या त्याच्या उत्तराने पोलिसही स्तब्ध झाले. प्रसाद लोणारे या संवेदनशील पोलिस अधिकाऱ्याने त्याचा शैक्षणिक खर्च उचलला आणि त्याला शाळेत प्रवेश मिळवून दिला. गुन्हेगारीकडे वळलेली राजाची पावले आता शिक्षणाकडे वळली आहेत.

हडपसर पोलिस ठाण्याच्या हद्दीत चोरी, जबरी चोरी, घरफोडी, वाहनचोरी करणाऱ्या 'कोयता गँग'ने नागरिकांमध्ये दहशत निर्माण केली होती. सराईत गुन्हेगारांसमवेत अल्पवयीन मुलेही या प्रकरणांमध्ये सहभागी असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानुसार मांजरी पोलिस चौकीतील सहायक पोलिस निरीक्षक प्रसाद लोणारे यांनी अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले. नेहमीप्रमाणे अल्पवयीन मुलांना बालसुधारगृहामध्ये पाठविण्याची प्रक्रिया पोलिसांनी सुरू केली. यातील अल्पवयीन असलेल्या राजाला पोलिसांनी चुकीचा मार्ग पत्करण्याचे कारण विचारले. त्या वेळी, 'आई मोलमजुरी करून भावाला शिकवते. आईकडे पुरेसे पैसे नाहीत. त्यामुळे मी आठवीतून शाळा सोडली. पण, मला शिकायचे आहे', असे उत्तर त्याने दिले. त्यावर, 'तुला शिकण्यासाठी मदत केली, तर तू हे प्रकार थांबविणार का?' असे लोणारे यांनी विचारल्यावर त्याने होकारार्थी मान डोलावली. लोणारे यांनी त्याला दुसऱ्या दिवशी चौकीला बोलाविले. शिक्षणाच्या आशेने दोन-चार दिवस तो दिवसभर चौकीत येऊन बसत होता. त्याच्यातील शिक्षणाची आस पाहून लोणारे यांनी मांजरीतील शाळेत त्याला नववीमध्ये प्रवेश मिळवून दिला.



**अल्पवयीन मुले बालसुधारगृहात पाठविल्यानंतर तेथे असलेल्या गंभीर गुन्हे करणाऱ्या अन्य मुलांच्या सान्निध्यात ती येतात. त्यांच्यासोबत राहिल्याने हीच मुले पुढे बाहेर येऊन सराईत गुन्हेगार होतात. त्यामुळे राजाला शिक्षणासाठी मदत करण्याचा निर्णय घेतला.**

– **प्रसाद लोणारे**, सहायक पोलिस निरीक्षक, हडपसर पोलिस ठाणे

### ...त्याला व्हायचेय पोलिस अधिकारी!

गुन्हेगारीकडे वळलेला राजा पुन्हा एकदा पुस्तकांमध्ये, शाळेच्या वर्गात रमला आहे. त्यालाही चांगले शिक्षण घेऊन मोठे व्हायचे आहे. राजालाही चांगला समाज घडविण्यासाठी जबाबदार पोलिस अधिकारी व्हायचे आहे.